# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 18 October 2024

## Time: 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १८ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.

****

झारखंडमधल्या विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना आज जारी होत आहे. २५ ऑक्टोबरपर्यंत यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. २८ तारखेला अर्जांची छाननी होईल, आणि ३० ऑक्टोबर ही अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत आहे. झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. झारखंडमध्ये सर्वच राजकीय आघाड्यांमध्ये जागावाटपाबाबतच्या चर्चेच्या फेऱ्या सुरू आहेत. राज्यात भाजपा, एजेएसयू, संयुक्त जनता दल आणि चिराग पासवान यांच्या एलजीपी पक्षांनी आघाडी केली असून, झारखंड मुक्ती मोर्चा काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल आणि मार्क्सवादी पक्षासोबत निवडणूक लढवणार आहे.

****

ऑनलाइन गैरव्यवहारांच्या वाढत्या धोक्याला नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकार आणि मेटा कंपनीनं 'स्कॅम से बचो' हे अभियान सुरू केलं आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालय, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, गृह मंत्रालय तसंच भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र यांनी मिळून या अभियानाचा आराखडा निश्चित केला आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्या उपस्थितीत या अभियानाचा काल नवी दिल्लीत प्रारंभ करण्यात आला. डिजिटल सुरक्षा आणि सतर्कता याबाबतच्या सरकारच्या दृष्टीकोनाचं प्रतिबिंब यामध्ये आहे हा उपक्रम अगदी योग्य वेळी सुरू झाला असून, ऑनलाइन घोटाळ्याचा वाढता धोका पाहता नागरिकांच्या हितासाठी केलेली ही आवश्यक उपाययोजना आहे असं जाजू यावेळी म्हणाले. डिजिटल इंडिया अभियानामुळे देशातली इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या ९० अब्जांवर गेली आहे, मात्र त्याचवेळी सायबर गुन्ह्यांची संख्याही वाढत असल्याचं त्यांनी नमूद केलं.

****

राष्ट्रीय क्रीडा सुशासन विधेयक २०२४ च्या मसुद्यामुळे देशात सशक्त आणि पारदर्शक क्रीडा सुशासन यंत्रणा उभी करण्यासाठी हातभार लागेल, असं केंद्रीय क्रीडामंत्री डॉ मनसुख मांडवीय यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत काल झालेल्या एका सल्लागार बैठकीत ते बोलत होते. खेळाडूंना केंद्रस्थानी ठेवून काम करण्यासाठी मंडळांना सक्षम करणं, सुरक्षित क्रीडा धोरण राबवणं तसंच क्रीडा न्यायाधिकरणाची स्थापना करणं हे या विधेयकाच उद्दिष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

मिथेनॉल, इथेनॉल आणि बायो सीएनजी सारख्या पर्यायी इंधनांमुळे भारताच पेट्रोलियमवरचं अवलंबित्व कमी होऊन आयातीत घट होऊ शकते, असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्लीत नीती आयोगाने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय मिथेनॉल कार्यशाळेत बोलत होते. सध्या पेट्रोलियमच्या आयातीवर दरवर्षी २२ लाख कोटी रुपये खर्च होतात. पर्यायी इंधन उत्पादन वाढल्यास हा खर्च घटेल, शिवाय प्रदूषणही कमी होईल असं ते म्हणाले.

****

हरित ऊर्जा हा भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या धोरणाचा महत्त्वाचा घटक असल्याचं, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. ते काल जागतिक व्यापार केंद्राच्या मुंबई विभागाने आयोजित केलेल्या, ‘ शाश्वत विकासासाठी हरित आणि नवीकरणीय ऊर्जा ’ या विषयावरच्या जागतिक व्यापार प्रदर्शनात बोलत होते. देशातली सर्वाधिक मोठी अर्थव्यवस्था असलेलं महाराष्ट्र राज्य, सौरऊर्जा, इलेक्ट्रिक वाहनं आणि बायोएनर्जी यासारख्या क्षेत्रांमध्ये देखील आघाडीवर असल्याचं ते यावेळी म्हणाले.

****

राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुण्यातल्या ६०० पदाधिकाऱ्यांनी नुकताच सामूहिक राजीनामा दिला आहे. पक्षाचे पुण्याचे शहराध्यक्ष दीपक मानकर यांना विधानपरिषदेच्या राज्यपाल नियुक्त आमदारांमध्ये संधी न दिल्यामुळे कार्यकर्ते नाराज झाल्यामुळे हा राजीनामा दिल्याचं सांगण्यात येत आहे.

****

विधानसभा निवडणुकीसाठी लातूर शहर आणि लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघा अंतर्गत नियुक्त करण्यात आलेले सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि विविध पथकांचे नोडल अधिकारी यांच्या कामकाजाचा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी आढावा घेतला. तसंच निवडणूक

प्रक्रिया शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. स्थिर निगराणी पथकं आणि भरारी पथकांनी निवडणूक काळात कोणतेही गैरप्रकार घडू नयेत, यासाठी दक्ष रहावं, कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास तातडीने कार्यवाही करून, त्याबाबतचा अहवाल संबंधित नोडल अधिकार्यांना यांना सादर करावा, आदी सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

****

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमा शुल्क विभागाच्या गुप्तचर यंत्रणेने तीन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये एक कोटी १३ लाख रुपये किमतीचे दीड किलो सोनं जप्त केलं आहे.

****

नेपाळमधे काठमांडू इथं सुरु झालेल्या सॅफ महिला फुटबॉल स्पर्धेत भारतानं काल पाकिस्तानवर ५-२ नं मात करत, विजयी सलामी दिली. ‘अ’ गटात भारताचा दुसरा सामना येत्या २३ तारखेला बांगलादेशाबरोबर होईल. स्पर्धेतला अंतिम सामना येत्या ३० तारखेला होणार आहे.

****

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी.व्ही. सिंधूनं महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. सिंधूनं चीनच्या हान यू हिचा १८-२१, २१-१२, २१-१६ असा पराभव केला. इतर सर्व भारतीय खेळाडूंना पहिल्या फेरीतच पराभवाचा सामना करावा लागला.

****

आसाममधल्या तामूलपुर या छोट्या गावातल्या खेलो इंडिया तलवारबाजी प्रशिक्षण केंद्रातल्या सहा तलवारपटूंची ६८ व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. पुढच्या महिन्यात जम्मू काश्मीरमध्ये या स्पर्धा होणार आहेत.

****